POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२३९ ● मुंबई, गुरुवार, ०२ एप्रिल २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

# आश्रय ट्रस्ट, ठाणे व सुधाकर बहुउद्देशीय सामाजिक संस्था, नाशिक यांच्या कार्याचा गौरव...

## पुरस्कार प्रदान सोहळा संपन्न









नाशिकच्या माजी महापौर यांना पुस्तक देताना



■ **बातमी /लेख,**
**प्रीती दिपक नाईक**

नाशिक स्टार न्यूज, नाशिक व महामहीम कला क्रीडा सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दिनांक 31 मार्च 2026 रोजी नाशिक येथील श्रीकृष्ण माधव मंगल कार्यालय, पेठ रोड येथे **''महिला रत्न पुरस्कार''** व **''महामहीम रत्न पुरस्कार''** सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात सामाजिक, आरोग्य व जनजागृती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी आश्रय सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक ट्रस्ट, ठाणे यांचे **आरोग्य विभाग सचिव पितामह प्रा. प्रकाश पांगम** सर यांना **''महामहीम रत्न पुरस्कार''** प्रदान करून गौरविण्यात आले.

यावेळी ट्रस्टमार्फत राबविण्यात येत असलेल्या **''थॅलेसिमिया मुक्त महाराष्ट्र''** या महत्त्वपूर्ण अभियानाचा विशेष उल्लेख करण्यात आला.

सदर अभियान हे आश्रय ट्रस्ट, ठाणे व सुधाकर बहुउद्देशीय सामाजिक संस्था, नाशिक (F-0022679) यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असून, महाविद्यालयीन तरुण–तरुणी तसेच त्यांच्या पालकांची रक्त तपासणी करून थॅलेसिमिया मुक्त समाज निर्माण करण्याचा उद्देश आहे. या उपक्रमाचे याप्रसंगी विशेष कौतुक करण्यात आले.

तसेच, **नेत्ररोग तज्ञ डॉ. प्राजक्ता जठार** यांना त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल **''स्टार महिला रत्न पुरस्कार''** प्रदान करण्यात आला.

**डॉ. संदीप बाळासाहेब भिसे** यांनाही **''महामहीम रत्न पुरस्कार''** देऊन सन्मानित करण्यात आले.

आश्रय ट्रस्टच्या माध्यमातून युवकांमध्ये सामाजिक जाणीव जागृती, रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे, तसेच सुदृढ जीवनशैलीबाबत जनजागृती अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून, या कार्याचा यावेळी गौरव करण्यात आला.

**श्री. रवी कुलकर्णी** (AK Diagnostic) हे देखील ट्रस्टच्या माध्यमातून रक्त तपासणी व विविध चाचण्या करत असून तेही कार्यक्रमास उपस्थित होते.

या कार्यक्रमात नाशिक स्टार न्यूज व महामहीम कला क्रीडा सांस्कृतिक मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना **''थॅलेसिमिया जागृती''** हे पुस्तक भेट देण्यात आले. तसेच समाजातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिला व पुरुषांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे आयोजन नाशिक स्टार न्यूजचे संचालक श्री विलास सूर्यवंशी सर व महामहीम कला क्रीडा सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष श्री विजय जगन्नाथ ठाकूर यांनी केले.

यावेळी प्रा. प्रकाश पांगम सर यांनी आश्रय ट्रस्टचे मुख्य विश्वस्त **स्वर्गीय डॉ. दीपक मालती मोरेश्वर नाईक यांनी आजवर राबवलेल्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती उपस्थितांना दिली. त्यांनी उभारलेले कार्य व ''थॅलेसिमिया मुक्त महाराष्ट्र''** हा संकल्प पुढे नेण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी माजी महापौर सौ. रंजनाताई पोपटराव भानसी तसेच नगरसेविका सौ. दिपाली गीते यांना देखील पुस्तकाची प्रत भेट देण्यात आली.

या कार्यक्रमामुळे आश्रय ट्रस्ट, ठाणे व सुधाकर बहुउद्देशीय सामाजिक संस्था, नाशिक यांच्या सामाजिक कार्याला अधिक प्रेरणा मिळाली असून **''थॅलेसिमिया मुक्त महाराष्ट्र''** या अभियानाला अधिक गती मिळणार आहे.

## कोकण विभागीय आयुक्तपदी श्रीमती रुबल अग्रवाल विराजमान... प्र.आयुक्त सिद्धराम सालीमठ यांच्याकडून स्वीकारला पदभार



■**नवी मुंबई। प्रतिनिधी,**

प्रशासकीय क्षेत्रातील आपल्या धडाकेबाज कार्यशैलीसाठी ओळखल्या जाणाऱ्या ज्येष्ठ सनदी अधिकारी रुबल अग्रवाल यांनी सोमवार, ३० मार्च २०२६ रोजी कोकण विभागीय आयुक्त पदाची सूत्रे स्वीकारली आहेत. त्यांनी प्रभारी विभागीय आयुक्त सिद्धराम सालीमठ यांच्याकडून या पदाचा कार्यभार अधिकृतपणे स्वीकारला.

२००८ च्या बॅचच्या आयएएस (IAS) अधिकारी असलेल्या रुबल अग्रवाल यांनी आपल्या कारकिर्दीत विविध महत्त्वाच्या पदांवर काम करून आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. यापूर्वी त्यांनी सोलापूर येथे सहायक जिल्हाधिकारी म्हणून आपल्या सेवेला सुरुवात केली होती. त्यानंतर अहमदनगर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) आणि अहमदनगर तसेच जळगाव येथे जिल्हाधिकारी म्हणून त्यांनी यशस्वी कामकाज पाहिले आहे.

श्रीमती रुबल अग्रवाल या शिर्डीच्या श्री साईबाबा संस्थान ट्रस्टच्या पहिल्या महिला मुख्य कार्यकारी अधिकारी होत्या. त्यांच्या काळात साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे नियोजन अत्यंत भव्य आणि शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते.

त्या पुणे महापालिकेत अतिरिक्त महापालिका आयुक्त म्हणून कार्यरत असताना त्यांनी कोविड-२०१९ च्या भीषण संकटाचे व्यवस्थापन अत्यंत प्रभावीपणे केले. त्यांच्या या कामगिरीची दखल राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर घेण्यात आली होती.

यापूर्वी त्यांनी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या (ICDS) आयुक्त म्हणून राज्यातील १ लाख १० हजार अंगणवाड्यांचे जाळे सक्षमपणे हाताळले आहे.

कोकण विभागीय आयुक्त पदावर येण्यापूर्वी त्या महा मुंबई मेट्रो ऑपरेशन कॉर्पोरेशन लिमिटेडच्या व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत होत्या.

श्रीमती रुबल अग्रवाल यांच्या उत्कृष्ट प्रशासकीय सेवेबद्दल त्यांना आतापर्यंत उत्कृष्ट जिल्हाधिकारी पुरस्कार (महाराष्ट्र शासन, २०१६-१७), महात्मा गांधी शांतता पुरस्कार (जळगावमध्ये कायदा व सुव्यवस्था राखल्याबद्दल), अरुण बोंगीरवार सार्वजनिक सेवा उत्कृष्टता पुरस्कार (पुणे शहरातील कोविड नियंत्रणासाठी), स्मार्ट सिटी डिजिटल पेमेंट आणि ई-गव्हर्नन्स पुरस्कार अशा अनेक प्रतिष्ठित महत्त्वाच्या पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

कोकण विभाग हा भौगोलिक आणि प्रशासकीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाचा विभाग मानला जातो. या विभागातील महसूल प्रशासन, पायाभूत सुविधांचे प्रकल्प आणि आपत्ती व्यवस्थापन या क्षेत्रांत रुबल अग्रवाल यांच्या दांडग्या अनुभवाचा मोठा फायदा होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी विभागातील कामकाजाचा आढावा घेण्यास सुरुवात केली असून, जनसामान्यांचे प्रश्न सोडविण्याला आपले प्राधान्य असेल, असे त्या यावेळी म्हणाल्या.

## समृद्धी महामार्गावर मृत्यूचं तांडव

### भरधाव ट्रकने महिला मजुरांना चिरडलं, जालन्यात 6 महिलांचा जागीच अंत

■**जालना। प्रतिनिधी,**

जालना जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावर आज बुधवारी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास अत्यंत दुर्दैवी आणि भीषण अपघाताची घटना घडली आहे. जालन्यातील कडवंची शिवारात हा भीषण अपघात झाला असून, या अपघातात ६ महिला मजुरांचा जागीच मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.



**महिला मजूर ट्रकखाली चिरडल्या**

मिळालेल्या माहितीनुसार, नागपूरहून मुंबईच्या दिशेने वेगाने जाणाऱ्या ट्रकने महामार्गावर काम करत असलेल्या महिला मजुरांना जोरदार धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की काही महिला मजूर ट्रकखाली चिरडल्या गेल्या आणि त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. या अपघातानंतर घटनास्थळी हाहाकार माजला होता. अपघाताची माहिती मिळताच तालुका जालना पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी पंचनामा आणि पुढील तपासाची प्रक्रिया सुरू केली आहे. तसेच स्थानिक नागरिकांनीही तत्परता दाखवत मदतकार्य हाती घेतले आणि जखमींना रुग्णालयात हलवण्याचा प्रयत्न केला.

**लेकरांचा मन हेलावणारा आक्रोश**

या घटनेमुळे समृद्धी महामार्गावरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. महामार्गावर काम करणाऱ्या मजुरांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत का? असा सवाल उपस्थित होत आहे. दरम्यान, या अपघाताबाबत अधिकृत माहिती मिळवण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू असून, मृतांचा आकडा आणि ओळख पटवण्याचं काम सुरू आहे. या घटनेवर माजी मंत्री अर्जुन खोतकर यांनीही प्रतिक्रिया देत दुःख व्यक्त केलं आहे. पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून, अपघाताचं नेमकं कारण लवकरच स्पष्ट होणार आहे. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच नातेवाईकांपैकी कुणी रुग्णालयात पोहोचलं तर कुणी अपघातस्थळी पोहोचले. तिथलं दृश्य पाहून लेकरांनी एकच आक्रोश केला.

### कार्यक्रमाला जाण्याआधीच आक्रित घडलं...



धुळ्यातून धक्कादायक बातमी समोर आली आहे. मुंबई आग्रा राष्ट्रीय महामार्गावर भीषण अपघात झाला आहे. माती वाहतूक करणाऱ्या भरधाव डंपरने तिघांना चिरडल्याचे समोर आले आहे. या अपघातात काका पुतण्यासह तिघांचा मृत्यू झाला आहे. धुळ्यातील नरडाणा गावाजवळ ही घटना घडली आहे. त्यामुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आले आहे. या अपघाताबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात. समोर आलेल्या माहितीनुसार, मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर नरडाणा गावाजवळ भीषण अपघात झाला आहे. भरधाव डंपरने दोन मोटरसायकलींना धडक देत चिरडले. या अपघातात अपघातात एका मोटरसायकल वर असलेले गणेश ज्ञानेश्वर माळी (वय 22) आणि सुमीत देविदास माळी (वय 14) यांचा मृत्यू झाला. बेटावद येथे कार्यक्रमासाठी जात असताना माळी या काका पुतण्याचा अपघात झाला. तसेच दुसऱ्या मोटरसायकलवर असलेल्या सुधाकर श्रावण बडगुजर (वय 50)यांचा मृत्यू झाला आहे.

## घराच्या आवारात गांजाची लागवड... गुन्हे शाखेची धडक कारवाई, २१ किलो गांजासह आरोपी जेरबंद

■**सोलापूर। प्रतिनिधी,**

सोलापूर शहरात एक अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. सहसा ग्रामीण भागात किंवा दुर्गम शेतात गांजाची बेकायदेशीर लागवड केली जाते, मात्र सोलापूर शहरात चक्क एका राहत्या घराच्या आवारात गांजाची लागवड करण्यात आल्याचे समोर आले आहे. याप्रकरणी सोलापूर शहर गुन्हे शाखेने धडक कारवाई करत मोठ्या प्रमाणात गांजाची झाडे जप्त केली असून एका आरोपीला अटक केली आहे.

**नेमकी घटना काय?**

सोलापूर शहर गुन्हे शाखेला शहरातील एका भागात राहत्या घराच्या आवारात आणि समोरील मोकळ्या जागेत अमली पदार्थांची (गांजा) झाडे लावल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तातडीने संबंधित ठिकाणी छापा टाकला. यावेळी पोलिसांना घराच्या परिसरात लावलेली गांजाची ५९ हिरवीगार झाडे आढळून आली. ही झाडे पाहून पोलीस अधिकारीही चक्रावून गेले.

**शहरात खळबळ**

शहराच्या मध्यवस्तीत किंवा लोकवस्ती असलेल्या भागात अशा प्रकारे अमली पदार्थांची लागवड झाल्याने नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. हा गांजा केवळ स्वतःसाठी लावला होता की याची मोठ्या प्रमाणावर विक्री केली जात होती, याचा तपास आता गुन्हे शाखा करत आहे. सोलापूर पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे अमली पदार्थ विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.



या छाप्यात पोलिसांनी तब्बल २१ किलो ४३९ ग्रॅम वजनाचा गांजा जप्त केला आहे. जप्त करण्यात आलेल्या या गांजाची बाजारपेठेतील अंदाजे किंमत ४ लाख ३९ हजार रुपये इतकी असल्याचे सांगण्यात आले आहे. पोलिसांनी ही सर्व झाडे उपटून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली आहे. याप्रकरणी पोलिसांनी रजाक गफुर शेख या संशयित आरोपीला जागीच अटक केली आहे. आरोपीला न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याची गुन्ह्याची व्याप्ती लक्षात घेऊन ४ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

## 'तुझ्या मुलीला माझ्याकडे पाठव...' महिला आरोपीकडे पोलिसाची आक्षेपार्ह मागणी...

■**अकोला। प्रतिनिधी,**

'सदरक्षणाय खलनिग्रहणाय' हे ब्रीदवाक्य असणाऱ्या पोलीस दलाच्या प्रतिमेला धक्का देणारी एक बातमी समोर आली आहे. अकोला शहरातील सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याच्या लॉकअपमध्ये असलेल्या एका महिला आरोपीकडे, कर्तव्यावर तैनात असलेल्या सहायक पोलीस उपनिरीक्षक (एएसआय) राजेश जाधव याने तिच्या मुलीला 'शारीरिक सुखासाठी' पाठवण्याची धक्कादायक मागणी केली. या संतापजनक प्रकारामुळे पोलीस विभागात मोठी खळबळ उडाली असून, आरोपी एएसआयला तातडीने निलंबित करण्यात आले आहे.



### पदाचा गैरवापर करत आक्षेपार्ह मागणी

मिळालेल्या माहितीनुसार, 80 लाख रुपयांच्या आर्थिक फसवणुकीच्या गुन्ह्यात संबंधित महिलेला अटक करून सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याच्या लॉकअपमध्ये ठेवण्यात आले होते. यादरम्यान एएसआय राजेश जाधव याने पदाचा गैरवापर करत महिलेला पैशांचे आमिष दाखवले आणि तिच्या मुलीबद्दल अत्यंत आक्षेपार्ह मागणी केली. पीडित महिलेने या प्रकाराची तक्रार वरिष्ठांकडे केल्यानंतर पोलीस विभागात खळबळ माजली.

**वरिष्ठ अधिकाऱ्यांनी फटकारले**

या घटनेचा एक व्हिडिओही समोर आला आहे, ज्यामध्ये वरिष्ठ पोलीस अधिकारी आरोपी एएसआयची कडक शब्दांत कानउघडणी करताना दिसत आहेत. 'वर्दी घातली आहेस ना तू... असे कृत्य करताना तुला लाज वाटली नाही का?' अशा शब्दांत वरिष्ठांनी त्याला फटकारले. संतापलेल्या अधिकाऱ्याने आरोपीला मारण्याचा प्रयत्नही केला, मात्र वर्दीची मर्यादा राखून स्वतःला रोखले. सध्या राजेश जाधव विरुद्ध विनयभंगासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असला, तरी अद्याप त्याला अटक झालेली नाही.

**कठोर कारवाईची मागणी**

रक्षकच जेव्हा भक्षक बनतात, तेव्हा महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर येतो. पोलीस ठाण्यासारख्या सुरक्षित ठिकाणी जर महिलांना अशा अश्लील मागण्यांचा सामना करावा लागत असेल, तर सामान्य जनतेने कोणाकडे पाहायचे, असा सवाल उपस्थित होत आहे. आर्थिक गुन्हे शाखेमार्फत या प्रकरणाचा अधिक तपास केला जात असून, आरोपीवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# दरवर्षी नेमके पाणी मुरते कुठे?



ठाणे जिल्ह्यात ग्रामीण दुर्गम भागात जानेवारीतच पाणी टंचाईला सुरुवात होते. पुढे मार्च ते जूनपर्यंतचे चार महिने उत्तरोत्तर टंचाई आणखी तीव्र होते. ठाण्यातील ग्रामीण भागातील पाणीप्रश्नाविषयी दरवर्षी सरकारी यंत्रणा, पाटबंधारे विभाग तसेच स्थानिक प्रशासनाकडून टंचाईवर मात करण्यासाठी उपाययोजना आखल्या जातात. पाणी टंचाई आराखडा जाहीर केला जातो तरीही दरवर्षी परिस्थिती 'जैसे थे' असते. ठाणे जिल्ह्याच्या हक्काचे पाणी नक्की कुठे मुरते, हा प्रश्न उत्तरे असूनही कित्येक वर्षांपासून निरुत्तरीत राहिला आहे. ठाणे जिल्ह्यातील शहापूरचा पाणीप्रश्न दरवर्षी नियमित चर्चिला जातो आणि ठाणे जिल्ह्यातील पाणीदार तालुका म्हणून शहापूरचे नाव राज्यात अग्रक्रमाने घेतले जाते. हा परस्परविरोधाभास मागील कित्येक दशके जाणीवपूर्वक कायम ठेवण्यात आला आहे. या पाणीप्रश्नाविषयी निकोप दृष्टिकोन ठेवल्यास हे मान्य करावेच लागेल की शहापूरमधील दुर्गम भागातील गोरगरीब आदिवासींच्या पाण्यावर मुंबईसारखी शहरे पोसली, पोसवली गेली आहेत. 'धरण उशाला, कोरड घशाला' ठाणे जिल्ह्यातील दुर्गम भागातील रहिवाशींची तहानलेली कोरडी व्यथा मांडणारा हा मथळाही वर्तमानपत्रातून दरवर्षी छापून घासून गुळगुळीत झालेला आहे. आदिवासींच्या हक्काचे पाणी पळवणारे शहरवासी, लगतची औद्योगिक केंद्रे, उंचच उंच उभारले जाणारे गृहप्रकल्पातील रहिवासी आणि अशा बांधकामांसाठी लागणारे मुबलक पाणी शोषणारे आपण शहरवासीयच आहोत. बरं, हे आदिवासींचे पाणी पळवून आपण त्यांच्या पदरात पुरेसा मोबदलाही टाकलेला नाही. तानसा, भातसा परिसरातील कित्येक आदिवासी जलप्रकल्पग्रस्त अजूनही मोबदल्याच्या प्रतीक्षेत आहेत. जमिनी आदिवासींच्या, पाणीही आदिवासींचे असताना हे पाणी मोठमोठ्या जलवाहिन्या टाकून शहरांकडे वळवण्याची स्पर्धा आजची नाही, कारण जिवंत माणसं केवळ शहरातच राहतात का? आदिवासींना 'माणूस' मानायला सरकार, सामाजिक व्यवस्था आणि प्रशासकीय यंत्रणा स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपर्यंत अजूनही तयार नाही. त्यांचे निखळ माणूसपण मान्य केल्यास आपले जलचौर्यकर्महीही मान्य करावे लागते, ही यामागची मेख आहे. शहरे वाढायला हवीत याविषयी दुमत असण्याचे कारण नाही, मात्र ही वाढ ज्यांच्या पाण्यावर पोसली जाते त्या गावपाड्यांना शहरांनी मोबदल्यात काय दिले? तर आठवड्यातून एखाद दिवस एखादा टँकर पोहचता केला. या पलीकडे शहरवासीयांचे त्यांच्यासाठी काहीही योगदान नाही. प्रकल्पग्रस्त म्हणून त्यांना मिळणाऱ्या सरकारी सेवेतील नोकऱ्यांचा प्रश्न पन्नास वर्षांपासून सुटलेला नाही. आपण या आदिवासींच्या मुलांसाठी आरोग्य, शिक्षण आणि रोजगार तसेच सन्मानाने माणूस म्हणून आयुष्य जगण्याची पुरेशी संधी उपलब्ध करून देवू शकलो नाही. आदिवासी गावपाड्यांमध्ये अजूनही महिला मुलांना पाण्यासाठी डोक्यावर हंडे घेऊन मैलोनमैल पायपीट करावी लागते, ही शहरवासीयांसाठी आणि सरकारी यंत्रणांसाठी शरमेची बाब आहे. पर्जन्यवृष्टीचा विचार करता महाराष्ट्रावर वरुणराजाची मोठी कृपा आहे. कोकणपट्टा तर वरुणराजाचा त्याबाबत लाडाचा म्हणावा लागेल, मागील वर्षी मराठवाड्यातही जोरदार पाऊस होऊनही पाणीटंचाईचा प्रश्न कायम असण्यामागे धोरणात्मक जलनियोजनाचा अभावच कारण आहे. पाटबंधारे विभाग, सिंचन, कृषी, पाणीपुरवठा आदी विभाग, नगरपारिषदा, महापालिका, ग्राम पंचायती, जिल्हा परिषदा त्यावरही राज्य आणि केंद्र सरकारी यंत्रणा असतानाही दुर्गम, अवर्षणप्रवण भागात आपण मागील शंभर वर्षात पुरेसे पाणी पोहचवू शकलो नाही. सरकारी यंत्रणेतील भ्रष्टाचार, संधीसाधू राजकारण, सरकारी योजनांतून पाणीपुरवठ्यासाठी पाठवलेला निधी कंत्राटदार, स्थानिक राजकारणी, अधिकाऱ्यांनी आधीच 'बांध' घालून वळवलेला आहे. महाराष्ट्रासारख्या विक्रमी पावसाची परंपरा असलेल्या राज्यात जलयुक्त शिवार, शेततळी योजना राबवण्याची वेळ येणे ही आपलीच ऐतिहासिक नामुष्की आहे. त्यातूनही अशा कित्येक योजनांची असफलता ही या नामुष्कीचीही नामुष्की आहे, याचं वैषम्यही आपल्याला आता वाटेनासे झाले आहे. भ्रष्टाचाराचं पाणी मुरतं इथपर्यंतही ठिक होतं. पण आता आदिवासी गोरगरीबांची धरणंच्या धरणं, कालवेच्या कालवे, तळीच्या तळी आणि विहिरीही आपण लंपास केल्या आहेत. मुबलक पाऊस असताना केवळ आणि केवळ आपल्याच नाकर्तेपणामुळे ग्रामीण भाग आपणच तहानलेला ठेवला आहे. शहरातील इमारती, उद्योगांना अगदी अशोक खरातसारख्या हिडीस गुन्हे प्रवृत्तीलाही आपल्या प्रशासकीय यंत्रणेने बेकायदा जलवाहिन्या जोडून खत 'पाणी' दिले आहे. ज्यांचा पाण्यावर पहिला हक्क असतो, त्यांच्या वाटणीचे पाणी नक्की कुठे मुरते? हे सगळ्यांना माहीत असते, परंतु त्याविषयीचे मौन हे सर्वसमावेशक आणि सत्ताधारी तसेच विरोधकांमध्येही असलेल्या 'मिलीजुली'चे द्योतक असते. गावपाड्यात बोअरवेल कोरडे पडत आहेत. विहिरी तळ गाठत असताना 'दयेचा' एखादा टँकर पाठवून आपल्या पाणीचोरीच्या गुन्ह्याचे प्रायःश्चित होणार नाही. पाण्याचे सुयोग्य नियोजन करतानाच असे पाणी बेकायदा साठवणारी प्रशासनातील भ्रष्टाचाराची डबकी बुजवण्याची गरज आहे. पाणी टंचाईसाठी निसर्गाला दोष देण्याचा अधिकार आपण कधीचाच गमावून बसलो आहोत. दुर्गम दुर्लक्षित श्रमिक शोषितांना आपण आरोग्य, शिक्षण पुरेसे देऊ शकलो नाहोत, निदान त्यांच्या हक्काचे पाणी तरी त्यांना देऊयात, तेव्हाच या कृतघ्नतेतून आपली थोडीफार सुटका होईल.

# बांगलादेशी घुसखोरांचा मागोवा



**मुंबईतील बांगलादेशी घुसखोर शोधून त्यांच्यावर कारवाईचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाने मध्यंतरी दिला. घुसखोरांचा प्रश्न हा कायदा-सुव्यवस्था, अंतर्गत सुरक्षा यांच्याशी संबंधित आहे. म्हणूनच त्यांचा माग काढणे अनिवार्य आहे.**

एरवी निवडणुका आल्या की, राजकीय पटलावर गाजणारा बांगलादेशी घुसखोरांचा मुद्दा मुंबई महापालिकेच्या 'फेरीवाला हटाव' धोरणामुळे सध्या चांगलाच चर्चेत आहे. व्होट बँक हा राजकीय फायदा असला तरी हे घुसखोर म्हणजे देशातील अंतर्गत सुरक्षेसाठी मोठा धोका आहे. म्हणूनच मुंबई उच्च न्यायालयाने बांगलादेशींना शोधण्याचे आदेश पोलिसांना दिले आहेत. परंतु 'भारतीय ओळख' मिळवून राहणाऱ्या या परकीयांना शोधणे तितके सोपे नाही. त्यात पोलिसांना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागते.

मुंबई तसेच आजूबाजूच्या महानगर क्षेत्राला भेडसावणारी घुसखोरांची समस्या अनेक वर्षे जुनी आहे. भारताच्या सीमारेषेला लागून असलेल्या देशांमध्ये राजकीय आणि आर्थिक अस्थिरता तसेच अराजकता आहे. त्यामुळे पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश आणि श्रीलंकेतून नागरिक भारतामध्ये येतात. ते येतात पोटापाण्यासाठी, चांगले जीवन जगण्यासाठी. काहीतरी कारण पुढे करून व्हिसा मिळवून त्याआधारे भारतामध्ये प्रवेश मिळवला जातो. एकदा का प्रवेश मिळाला की, हे नागरिक व्हिसाची मुदत संपूनही मायदेशी परतण्याचे नावच घेत नाहीत. ज्या विदेशी नागरिकांना वैध प्रवेश मिळत नाही ते सीमारेषेवरून बेकायदा घुसखोरीचा मार्ग अवलंबतात. देशाच्या सीमारेषेवर अनेक गावे एकमेकांच्या अगदी नजीक आहेत. सीमारेषेवरील शेतशिवारात राबणाऱ्या गरीब गावकऱ्यांना पैशांची लालूच दाखवून देशामध्ये छुप्या पद्धतीने बेकायदा प्रवेश मिळवला जातो. हे गावकरी नदी, जंगलाच्या आडवाटेतून अगदी पाचशे- हजार रुपयांपासून ते पाच-दहा हजार रुपये घेऊन सीमारेषा ओलांडून देतात. सीमेवरील गावांमध्ये सीमा पार करून देणारे एजंट आहेत, त्यांचा हा व्यवसायच आहे. या एजंटचा आधार घेत तर काही छुपे मार्ग शोधून त्यातून घुसखोरी करतात. काही दिवस भारताच्या सीमारेषेवरील गावांमध्ये, राज्यामध्ये वास्तव्य केल्यानंतर हे घुसखोर मुंबई, पुणे, दिल्लीसारख्या शहरांच्या दिशेने मोर्चा वळवतात.

केवळ सीमाच नाही तर अनेक शहरे, राज्ये पालथी घालून ही मंडळी महाराष्ट्रातील वेगवेगळ्या शहरांत आपले बस्तान बसवतात तरीही यंत्रणांना हे कळत नाही, हे कसे शक्य आहे? इतर देशांतील बेकायदा नागरिकही मुंबईत आणि महानगर प्रदेशात बेकायदा वास्तव्य करून आहेत, मात्र यामध्ये बांगलादेशींची संख्या कितीतरी अधिक आहे. त्यामागील कारणेही तशीच असल्याचे पोलिस अधिकारी सांगतात. बांगलादेशातील राजकीय अस्थिरता, तेथील हिंदूंवर होणारे हल्ले आणि अराजकता यामुळे बांगलादेशी नागरिक मोठ्या प्रमाणात पलायन करतात. बांगलादेशातील दहशतवादी संघटनांची पार्श्वभूमी पाहिली तर ही घुसखोरी चांगलीच महागात पडू शकते. काही वर्षांपूर्वी बौद्ध धर्मगुरू दलाई लामा यांच्या बिहारमधील बोधगया दौऱ्यादरम्यान दोन जिवंत शक्तिशाली बॉम्ब सापडले. या प्रकरणी कोलकाता स्पेशल टास्कच्या फोर्सने चौघांना अटक केली. या चौघांचे लागेबांधे बांगलादेशी दहशतवादी संघटना 'अन्सारुल्ला बांगला टीम' म्हणजे 'एबीटी'शी असल्याचे उघड झाले होते. बांगलादेशात सद्यस्थितीत चार दहशतवादी संघटना सक्रिय आहेत. हिज्ब-उत-तहरीर, हिज्य-उत-तौहीद, अल्लाह दल आणि अल-कायदा (एक्यूआयएस) या त्या संघटना असून बंदी असलेली 'अन्सारुल्ला बांगला टीम' (एबीटी) हिच्या कारवाया तर वारंवार उजेडात आल्या आहेत. भारतात फिरण्याच्या, व्यवसायाच्या किंवा घुसखोरी करून आलेल्या नागरिकांच्या मदतीने या संघटनांचे दहशतवादी भारतात आपले बस्तान बसवत असल्याचा धोका आहे. स्थानिक नागरिकांच्या मदतीशिवाय दहशतवादी काहीच करू शकत नाहीत. मुंबईत याआधी जे बॉम्बस्फोट घडविण्यात आले त्यातील आरोपींनी स्थानिकांच्या मदतीने भाड्याने घरे घेतलेली होती. त्यानंतर पोलिसांनी भाडेकरूंची माहिती देणे बंधनकारक केले. मात्र थोडे नागरिक हे बंधन पाळतात. झोपड्यांमध्ये तर कुणाचा कुणालाथांगपत्ताच नसल्याचे चित्र दिसते.

राज्यामध्ये दहशतवाद विरोधी पथकाप्रमाणे मुंबईतील पोलिस ठाण्यांमध्ये दहशतवाद विरोधी कक्ष सुरू करण्यात आले असून गुन्हे शाखेची पथकेही घुसखोरांना शोधण्याचे काम करतात. एखादा परिसर, वस्ती आणि त्यामध्ये वास्तव्य करणाऱ्यांची माहिती काढण्यासाठी तेथील स्थानिकांना, संस्थांना, विविध क्षेत्रातील व्यक्तींना विश्वासात घ्यावे लागते. विशेष म्हणजे, या परिसरातील खबरींचे जाळे पोलिसांना अधिक बळकट करावे लागते. एखादी व्यक्ती संशयास्पदरीत्या वास्तव्य करून राहत असल्याची माहिती मिळाल्यास पोलिस त्यांच्यापर्यंत पोहोचतात. भारतीय नागरिकत्त्वाच्या पुराव्यांबाबत विचारणा केली जाते. संबंधित व्यक्तीने रेशनकार्ड, पॅनकार्ड, आधारकार्ड आदी दिल्यास त्यांची पडताळणी केली जाते. ही ओळखपत्रे खरी असल्याचे दिसून आले तरी ती कोणत्या कागदपत्रांच्या आधारे मिळवली, संबंधित व्यक्तीच्या आधीच्या पिढीचे वास्तव्य कुठले, याची तपासणी पोलिस करतात. या व्यक्तीचे मूळ शोधण्यासाठी सर्वप्रथम त्याच्याकडून जन्म दाखला मागितला जातो. पश्चिम बंगालमधील एखाद्या गावातील जन्मदाखला या व्यक्तीने दिल्यास पोलिसांकडून संबंधित गावातील लोकप्रतिनिधी किंवा सरपंच यांच्याशी व्हिडीओ कॉलवरून संपर्क केला जातो. सरपंच या व्यक्तीला ओळखत असल्यास किंवा अन्य काही कागदपत्रे सादर केल्यास पुढे कारवाई केली जात नाही; मात्र त्याची ओळख पटली नाही तर या व्यक्तीला ताब्यात घेऊन त्याच्याकडून वस्तुस्थिती जाणून घेतली जाते. त्याच्या मोबाइलची झाडाझडती घेतली जाते, बांगलादेशी असल्यास त्याच्या मोबाइलमध्ये बांगलादेशच्या कोडसह असलेले फोन नंबर, पैसे पाठविण्यासाठी असलेले ॲप असे काहीतरी निश्चित सापडते. हा व्यक्ती भारतीय नसल्याचे स्पष्ट झाल्यास त्यापुढील प्रक्रिया केली जात असल्याचे एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

बनावट कागदपत्रांवर भारतीय ओळखपत्र काढून देणाऱ्या एजंटचा सुळसुळाट आहे. काही दिवसांपूर्वी दिंडोशी पोलिसांनी विरार येथून एका एजंटला पकडले होते. या एजंटकडे पाचशेपेक्षा अधिक बनावट रेशनकार्डे सापडली. चौकशीत त्याचा हा वडिलोपार्जित व्यवसाय असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले होते. मुंबईतच नाही, तर ठाणे, नवी मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर या शहरांमध्येही अशा एजंटवर कारवाई करण्यात आल्याची उदाहरणे आहेत. मात्र याचे मूळ असलेल्या पश्चिम बंगालमधील एजंटवर कोण आणि कसा आळा आणणार, हा प्रश्न आहे.

बांगलादेशी घुसखोर पकडल्यावर पोलिसांची खरी परीक्षा पुढे असते. त्यांच्यावर नियम ३ सह ६ पारपत्र १९५० सह परि ३-१ परकीय नागरिक आदेश १९४८ सह कलम १४ परकीय नागरिक कायदा, १९४६ या कायद्यान्वये विशेष स्थानिक गुन्ह्याची नोंद होते. अटक करून पुढे या व्यक्तींवर खटला चालवला जातो. मात्र या प्रक्रियेत शिक्षा होईपर्यंत बराच कालावधी जातो आणि तोवर जामीन मिळवून घुसखोर कारागृहाबाहेर येतात. बाहेर येताच नवी ओळख धारण करून अन्य शहरात किंवा राज्यात निघून जातात. यादरम्यान न्यायालयाने संबंधित आरोपी घुसखोर आहे, असा निकाल दिला तर पुन्हा त्याला शोधण्याचे आव्हान असते. ते सर्व टाळण्यासाठी विशेषतः ऑपरेशन सिंदूरनंतर गृहविभागाने खटल्याची प्रक्रिया वगळून थेट प्रत्यार्पण करण्याची मुभा पोलिस यंत्रणांना दिली. या आदेशानंतर मुंबईसह राज्यातील पोलिस यंत्रणांनी धडक मोहीम हाती घेतली. एखादा व्यक्ती बांगलादेशचा नागरिक असल्याचे निदर्शनास आल्यास भारतीय दूतावासाच्या माध्यमातून त्याच्या बांगलादेशातील नातेवाइकांशी संपर्क साधून खातरजमा केली जाते. खात्री पटल्यास पुणे येथील सैन्याच्या हवाईतळावर नेले जाते आणि तेथून सीमारेषेवर तैनात असलेल्या सीमा सुरक्षा दलाच्या स्वाधीन केले जाते. सीमा सुरक्षा दलाचे जवान रीतसर प्रक्रियेनुसार त्याचा ताबा बांगलादेशच्या सीमेवरील यंत्रणांकडे देतात. यादरम्यान विदेशी पाहुण्यांना सांभाळण्यासाठी पोलिसांना मोठी कसरत करावी लागते.

विदेशी नागरिकांना इतर गुन्ह्यांतील आरोपींसोबत ठेवणे धोक्याचे असते. त्यांना पोलिस ठाण्याचे आवार, तुरुंग परिसरातील एखाद्या खोलीत वा अन्य ठिकाणी त्यांची विशेष व्यवस्था करावी लागते. त्यांच्याबाबत काहीही अनुचित घडल्यास त्याचे दूरगामी परिमाण होण्याचा धोका असतो. परराष्ट्र धोरणाला कुठेही बाधा पोहचू नये यासाठी प्रत्यार्पण करेपर्यंत त्यांचा सांभाळ करावा लागतो. त्यामुळे अशा विदेशी पाहुण्यांना ठेवण्यासाठी मुंबईमध्ये 'डिटेन्शन सेंटर' उभारण्यासाठी पोलिसांनी राज्य सरकारकडे प्रस्ताव धाडला आहे. मुंबई पोलिसांनी २०२५ मध्ये १२०० पेक्षा अधिक बांगलादेशी नागरिकांना शोधून काढत १०५८ जणांना पुन्हा मायदेशी धाडले. २०२६ मध्येही ही मोहीम तशीच सुरू असून ७० पेक्षा अधिक घुसखोरांची आतापर्यंत धरपकड करण्यात आली आहे.

मुंबई, ठाणे, नवी मुंबई, मीरा भाईंदर, वसई-विरार, पालघर या शहरांत हातपाय पसरल्याचे धक्कादायक वास्तव आहे. घुसखोरांच्या अतिक्रमणामुळे शहरे तर बकाल होत आहेच, पण त्याचबरोबर अंतर्गत सुरक्षा देखील धोक्यात आहे आणि म्हणून सरकारी, पोलिस यंत्रणांबरोबर सामान्य नागरिकांनाही सतर्क राहणे ही काळाची गरज आहे. कारण, पोलिस म्हणतात तसे, सर्वसामान्य नागरिक हेच आमचे डोळे आणि कान आहेत. हे सारेच जागरूक हवे.

# बडगा उगारलाच पाहिजे!

**वर्षअखेरीस योजनांसाठी मंजूर निधी पूर्णपणे खर्च करण्यात अपयश आल्यामुळे प्रशासनाची कार्यक्षमता प्रश्नांकित होत असून, उर्वरित निधी घाईघाईने खर्च करण्याची धडपड सुरू आहे.**

मार्च महिन्याचा शेवटचा आठवडा म्हणजे आर्थिक वर्षाची अखेर. बँका, वित्तीय संस्था, कॉर्पोरेट यांची हिशेब पूर्ण करण्याची घाई ३१ मार्च जवळ येतो, तशी वाढत जाते. मात्र या निमित्ताने सरकारच्या विविध खात्यांची वर्षाच्या सुरुवातीला अर्थसंकल्पाद्वारे मंजूर झालेला निधी खर्च करण्यासाठी शासन निर्णय जारी करण्याची धावपळ, याला 'काळा विनोद'च म्हणायला हवे. जनतेकडून करसंकलनाच्या माध्यमातून सरकार जनकल्याणासाठी ज्या योजना जाहीर करते, त्यावर नियत व्यय म्हणून जो निधी अर्थसंकल्पात जाहीर होतो, तो पूर्णपणे खर्च होत नसेल तर ही सरकारसाठी मोठीच नामुष्की म्हणायला हवी. गेल्या चार-पाच वर्षांची योजनांवरील खर्चाची आकडेवारी पाहिली तर ती साधारण साठ टक्क्यांच्या आसपास दिसते. याचाच अर्थ चाळीस टक्के निधी योजनांवर खर्च करण्याची सरकाराची असमर्थता यातून दिसते. यंदाच्या आर्थिक वर्षात विविध योजनांवर ठरलेल्या निधीच्या केवळ साठ टक्केच खर्च करण्यातच राज्य सरकार यशस्वी ठरले. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदाचा खर्च केवळ एखाद टक्क्याने वाढला आहे. सर्वाधिक खर्च हा महिला व बालकल्याण विभागाचा झाला असून तो जवळपास ८२ टक्क्यांच्या आसपास आहे. याचे कारण महिला व बालकल्याण विभागाच्या आंतर्गत येणारी 'लाडकी बहीण योजना'. सर्वाधिक कमी खर्च हा गृहनिर्माण विभागावर झालेला आहे. खरे तर सर्वाधिक शहरीकरण असलेल्या महाराष्ट्रात घरांची समस्या फार मोठी आहे. तरीही या विभागावर केवळ २२ टक्के सरकार खर्च होत असेल तर याला काय म्हणावे? याच पार्श्वभूमीवर आता मंत्रालयातील बाबूंचा उर्वरित ४० टक्के निधी कोणत्या ना कोणत्या चौकटीत बसवून खर्च करण्याचा आटापिटा सुरू आहे. रविवारी सुट्टी असतानाही शासन निर्णयांचे शतक सरकारने या निमित्ताने केले. सोमवारीदेखील मंजूर निधी खर्च करण्यासाठी शासन निर्णय जारी करण्याचा खटाटोप सुरूच होता. एकीकडे राज्याचे मुख्यमंत्री प्रशासनात गतिमानता व पारदर्शकता यावी म्हणून प्रशासकीय यंत्रणेसाठी १०० दिवसांचा व नंतर १५० दिवसांचा कृती आराखडा राबवण्यासारखा स्तुत्य उपक्रम घेतात. त्या अंतर्गत प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये जनताभिमुख कारभार करण्याची आपसात स्पर्धा व्हावी यासाठी पुरस्कार दिले जातात, तरीही मंजूर निधीच्या ६० टक्केच खर्च का होतो? सरकार कुणाचेही असो, प्रशासनातील आळस, कामाप्रति असलेला कंटाळा, जनतेच्या प्रश्नांप्रति नसलेली आपुलकी हीच यामागची कारणे आहेत. कोणताही प्रकल्प पूर्ण होण्यासाठी तीन वर्षांपेक्षा अधिक कालावधी लागती कामा नये, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी ठणकावून सांगितल्यानंतरही दर वर्षी निधी खर्च करण्यात प्रशासन असमर्थ ठरत असेल तर मुख्यमंत्र्यांनी ढिम्म प्रशासनाला जागे करण्यासाठी बडगा उगारणे गरजेचेच आहे. कंत्राटे देताना होणारी अनागोंदी हे देखील यामागील एक कारण. कंत्राटे देण्याचे काही निकष असले तरी प्रत्यक्षात ती देताना वेगळेच निकष लावले जातात. यामागे अर्थकारण व राजकारण या दोन्ही बाबी असतात. मात्र काहीही झाले तरी ठरलेले काम पूर्ण करणे इतकी किमान अपेक्षा कररूपाने सरकारी तिजोरी भरणाऱ्या जनतेची असते. सरकारी कामांच्या दर्जाबाबत जनता किती सहनशील आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. मात्र कमी प्रतीची का असेनात, जनोपयोगी कामे व्हायला हवीत, इतकीही किमान अपेक्षा जनतेने ठेवायची नसेल तर जनतेला लोकशाहीच्या सबळीकरणासाठी मतदान करण्याचे आवाहन कशासाठी करायचे?

# 'त्या' मास्टर स्ट्रोकचा काळा पैसा गेला कुठे?

**भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काळा पैसा परत आणण्यासाठी दोन मास्टर स्ट्रोक लगावले. 2014 मधील लोकसभा निवडणुकीपूर्वी दीड वर्ष त्यांनी काळा पैसा परत आणणार म्हणून रान उठवले होते तर 2016 मध्ये नोटबंदीचा धडाकेबाज निर्णय घेऊन काळा पैसा आणि काळे पैसेवाल्यांना मोठा झटका दिला होता. त्यापैकी किती काळा पैसा देशात परत आला, कोणाकोणाच्या खात्यात 15-20 लाख रुपये जमा झाले, हे देश जाणतो आहे. मात्र, एवढे होऊनही आज त्याच काळ्या पैशांविषयी कुणीही काही बोलत नाही, याचे जास्त आश्चर्य वाटते**



नरेंद्र मोदी यांनी 26 मे 2014 या दिवशी पंतप्रधानपदाची शपथ घेतली. यंदा मे महिन्यात त्यांच्या पंतप्रधानपदाला एक तप पूर्ण होईल. तेव्हापासून पंतप्रधानांनी अनेक आश्वासने दिली. या सर्वांमधील सर्वात जबरदस्त आश्वासन होते ते म्हणजे काळा पैसा देशात परत आणण्याचे. भाजपने 2014 च्या लोकसभा निवडणुकीसाठी वर्षभर आधीच नरेंद्र मोदी यांची पंतप्रधानपदासाठी घोषणा करून देशभर प्रचाराचा धुरळा उडवला होता. प्रत्येक राज्यात जाऊन प्रादेशिक भाषेत भाषण सुरू करून त्यांनी भाषिक साद घातली. शिवाय काळ्या पैशांमुळे देशाचे प्रचंड नुकसान होत असून तो परत आणण्यासाठी आमची सत्ता आणा, असे आवाहन ते करत असत. त्यांच्या भाषणाची मोहिनी भारतीयांना पडली होती. शिवाय काळा पैसा परत आला तर देशाचा मोठी विकास होईल, प्रत्येक गरीबाच्या खात्यात लाखो रुपये जमा होतील, आयुष्य सुखाचे जाईल, असे स्वप्न त्यांनी निवडणूक प्रचारात दाखवले होते. त्याचा अपेक्षित परिणाम झाला. शिवाय काँग्रेसला लोक वैतागलेले असल्यामुळे सत्ताधार्यांविरोधात लोकांच्या मनात रोष होताच. 2014 च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला बहुमत मिळाले, नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले आणि आता अच्छे दिन आले, असे चित्र रंगवायला सुरुवात झाली.

8 नोव्हेंबर 2016. पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाला काय संबोधणार, याची चर्चा सुरू झाली होती. अखेर रात्रीचे 8 वाजले प्रत्येकजण टीव्हीसमोर बसला होता. त्यावेळी काळा पैसा रोखण्यासाठी आणि भ्रष्टाचाराला ब्रेक लावण्यासाठी नोटबंदी करत असल्याची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली. 500 आणि एक हजार रुपयांच्या नोटा चलनातून 8 नोव्हेंबर 2016 च्या मध्यरात्रीपासून बाद केल्या जातील, अशी घोषणा करून पंतप्रधान मोदी यांनी देशभर खळबळ उडवून दिली होती. त्यानंतर पंतप्रधानांनी दिलेल्या 50 दिवसांच्या मुदतीत बाद झालेल्या नोटा बँकेत जमा करण्यासाठी भारतीयांना बँकेत रांगा लावायला लागल्या होत्या. फार पूर्वी लोक रेशनसाठी मोठ्या रांगा लावत असत. त्याची सर्वांना आठवण झाली. घरात असलेल्या 500 आणि 1000 रुपयांच्या नोटा सरकारला परत करण्यासाठी बँकांमध्ये भल्या मोठा रांगा लागलेल्या असायच्या. कारण हे पैसे बँकेत न भरल्यास त्यांची किंमत कवडीमोल होणार होती. त्यामुळे कष्टाचे पैसे सुरक्षित ठेवण्यासाठी लोक उन्हातान्हाची पर्वा न करता बँकांसमोर रांगेत उभे राहात होते.

24 मार्च 2020. जगभरात आणि देशात कोरोनाचा संसर्ग सुरू झाला होता. हा संसर्ग वाढू नये, पसरू नये म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 24 मार्च 2020 रोजी 3 आठवड्यांसाठी देशात लॉकडाऊनची घोषणा केली होती. तत्पूर्वी 22 मार्च रोजी जनता कर्फ्यू लावण्यात आला होता. तो संपल्यानंतर थाळ्या वाजवून, रॅली काढून आनंद व्यक्त करण्यात आला होता. कोरोनाच्या काळात लोकांचे किती हाल झाले हे सर्वांनाच ठाऊक आहे. औषधांसाठी रांगा, ॲम्ब्युलन्ससाठी रांगा, रुग्णालयात दाखल होण्यासाठी रांगा, स्मशानातही रांगा, असे चित्र देशभर दिसत होते. लस उपलब्ध झाल्यानंतर लस घेण्यासाठी लागलेल्या भल्यामोठ्या रांगा, हे दृश्य कुणीही विसरलेले नाही. एवढेच नाही जवळ पैसा असूनही अन्न नाही म्हणून अन्नासाठी लोकांच्या रांगा लागल्या होत्या. कोरोनाने गरीब-श्रीमंत असा भेद न करता सर्वांना एकाच पातळीवर आणले होते. ऑक्सिजनची कमतरता होती, लसींचा पुरेसा पुरवठा होत नव्हता, अन्नधान्य मिळेल याची खात्री नव्हती. जवळपास दोन-अडीच वर्षे कोरोनातून तावून सुलाखून निघालेले भारतीय कोणत्याही संकटाचा सामना करायला तयार झाले होते. त्या काळात काही राज्यांना लसींचा पुरवठा कमी केला जात होता, ऑक्सिजनसाठी ताटकळत ठेवले जायचे, काही राज्यांवर कशी मेहेरबानी केली जाते, असे अनेक आरोप-प्रत्यारोप झाले. मात्र, केंद्राच्या तुलनेत महाराष्ट्र सरकारने कोरोनाशी चांगल्या पद्धतीने दोन हात केले, हे वास्तव कुणीही नाकारणार नाही.

24 मार्च 2026. अमेरिका-इस्त्रायल यांनी 28 फेब्रुवारीपासून इराणविरुद्ध युद्ध पुकारले. त्यानंतर अवघ्या चार-पाच दिवसांत भारतात गॅसची टंचाई निर्माण झाली. त्यानंतर अवघ्या 7 दिवसांत केंद्र सरकारने घरगुती गॅस सिलिंडरच्या दरात 60 रुपये आणि व्यावसायिक गॅस सिलिंडरच्या दरात 115 रुपयांची वाढ केली. व्यावसायिकांना गॅस मिळेनासा झाला. हॉटेल किंवा तत्सम उद्योगांना याची मोठी झळ पोहोचली. यावरूनच देशात गॅस टंचाई आहे, हे स्पष्ट झाले. शिवाय घरगुती गॅस सिलिंडर लवकर मिळत नाही, सरकारने नोंदणीचा कालावधी 21 दिवसांवरून 25 दिवस केला. तरीही गॅस मिळत नसल्याच्या तक्रारी आहेत. मात्र, सरकारच्या लेखी गॅस मिळत आहे. तरीही गॅस एजन्सींबाहेर रांगा लागलेल्या दिसत आहे. लोक उन्हातान्हात गॅसचा सिलिंडर मिळवण्यासाठी पहाटेपासून पाच-सहा तास रांगेत उभे राहात आहेत. आता हे कमी म्हणून की काय लोक पेट्रोल पंपावरही गर्दी करू लागले आहेत. पेट्रोल-डिझेलचा देशात पुरेसा साठा असूनही लोक दोन-तीन तास रांगेत राहात आहेत. थोडक्यात, प्रसंग कुठलाही असो, लोकांची रांगा लावण्यातून सुटका होत नाही. नोटबंदीच्या काळात रांगांमध्ये लोकांचा बळी गेला, कोरोनाकाळातही तशीच परिस्थिती होती आणि आता गॅसच्या रांगेत राज्यात अकोला जिल्ह्यात पहिला बळी गेला आहे. हे सर्व सुरू असताना गॅस सिलिंडर काळ्या बाजारात दुप्पट ते तिप्पट दरात विकले जात असल्याची चर्चा आहे. गॅस सिलिंडरची नोंदणी केल्यानंतर ग्राहकांच्या घरी सिलिंडर पोहोचत नाही मात्र, 'डिलिव्हर्ड'चा मेसेज येत आहे. त्यामुळे सिलिंडरचा काळाबाजार करून काळा पैसा वाढवण्याचे प्रयत्न जोरात असल्याचे चित्र आहे.

या सर्वांमध्ये समान धागा म्हणजे रांगा आणि काळा पैसा. परदेशातील विशेष करून स्विस बँकांमधील काळा पैसा देशात परत आणण्याचे आश्वासन 2013-14 च्या प्रचारसभांमध्ये मोदींनी दिले होते. काळा पैसा परत आला पाहिजे, या पैशांवर लोकांचा अधिकार आहे. सत्ता आल्यानंतर विदेशी बँकातील पैसा भारतात आणला तर प्रत्येकाच्या खात्यात किमान 15 लाख रुपये जमा होतील, असा त्यांचा प्रचाराचा रोख होता. 12 वर्षे झाली तरी स्विस बँकांमधील कथित काळा पैसा भारतात परत आलेला नाही आणि त्याबद्दल आता कुणी बोलतही नाही. तसेच नोटबंदी करून किती काळा पैसा सरकारने उघडकीस आणला, हेही अजून स्पष्ट झालेले नाही. 500 आणि हजार रुपयांच्या नोटा चलनातून बाद केल्यानंतर काही दिवसांतच 2 हजार रुपयांची नोट चलनात आणली गेली. 2018 नंतर 2 हजार रुपयांच्या नोटांची छपाई बंद करण्यात आली आणि 2023 अखेर 2 हजाराची नोट चलनातून काढून घेण्यात आली. मात्र, नोटबंदीनंतर 2 हजारांची नोट छापण्यावर सरकारने 17 हजार 688 कोटींचा खर्च केला. गंभीर बाब म्हणजे बंदी घातलेल्या नोटांपैकी (500 आणि हजारची नोट) 99.3 टक्के नोटा रिझर्व्ह बँकेकडे परत आल्या. केवळ .7 टक्के नोटा परत आल्या नाहीत. म्हणजे तेवढाच काळा पैसा होता, असे म्हणता येईल.

आता प्रश्न उपस्थित होत आहे की दोनवेळा काळ्या पैशांवर मास्टर स्ट्रोक मारूनही काळा पैसा कुठे गेला, याचे उत्तर कुणीच देत नाही. काळा पैसा म्हणजे ज्याच्या उत्पन्नाचा स्त्रोत अधिकृत नाही तो पैसा. मग काळा पैसा भारतीय अर्थव्यवस्थेत नाही का? आजही काळा पैसा निर्माण होत नाही का? व्यवहार करताना ब्लॅक आणि व्हाईट हे शब्द आजही वापरले जातात. मग या काळ्या पैशांचं आणि काळ्या व्यवहारांचं करायचं काय? जे 15 लाख गरिबांच्या खात्यात जमा होणार होते, त्याबद्दल आता कुणी म्हणजे कुणीही बोलत नाही. 2014 मध्ये 'अच्छे दिन'चे स्वप्न दाखवले आणि सत्तांतर झाले होते. त्यातून ना काळा पैसा परत भारतात आला ना भ्रष्टाचार संपला. 'सामना' या मराठी चित्रपटात मारुती कांबळेचं काय झालं, असा गहन प्रश्न आहे. तोच प्रश्न प्रत्येक भारतीय माणूस सरकारला विचारत आहे, काळ्या पैशांचे काय झाले? याचे उत्तर कधी तरी भारतीयांना मिळेल का?



# हनुमान जन्मोत्सव

हा पवित्र सण हनुमानजींच्या वाढदिवसानिमित्त साजरा केला जातो आणि यावेळी हनुमान जयंती 02 एप्रिल रोजी साजरी केली जाईल. या दिवशी हनुमानाची विशेष पूजा केली जाते. हनुमानजींचे भक्त या दिवशी त्यांच्यासाठी उपवास करतात आणि भक्तीभावाने हनुमानजींच्या पूजेमध्ये मग्न राहतात.हनुमानजींना रामाचे परम भक्त, समस्यानिवारक आणि अमर मानले जाते. मान्यतेनुसार, हनुमान जयंतीच्या दिवशी, भगवान हनुमानाला प्रसन्न करण्यासाठी आणि त्यांचे आशीर्वाद मिळविण्यासाठी पूजेसोबत काही विशेष उपाय केले तर व्यक्तीला त्याच्या त्रासांपासून मुक्तता मिळू शकते. तुम्ही जरी दररोज हनुमान चालीसा पठण करणे चांगले मानले जाते, परंतु हनुमान जयंतीच्या दिवशी हनुमान चालीसा पठण केल्याने बजरंगबली प्रसन्न होतात आणि आपल्याला मानसिक शांती देखील मिळते. हनुमानजींना संकटमोचन म्हटले जात असल्याने, हनुमान चालीसाचे पठण केल्याने व्यक्तीच्या जीवनातील सर्व संकटे नष्ट होतात. तुम्हाला जर तुमच्या महत्त्वाच्या कामांमध्ये अडथळे निर्माण होत असतील तर हनुमान जयंतीच्या दिवशी काही विशेष उपाय केल्यास तुम्हाला फायदे होतील. हनुमानजींना प्रसन्न करण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे रामाचे नाव घेणे आणि खऱ्या मनाने भजन गाणे. जेव्हा आपण खऱ्या भक्तीने सीतारामाचे गुणगान करतो आणि आपली भक्ती खरी असते, तेव्हा हनुमानजी आपोआपच त्यांचे आशीर्वाद देतात. हनुमानजींना गूळ-हरभरा आणि बुंदीचे लाडू खूप आवडतात. हनुमान जयंतीच्या दिवशी मंदिरात जाऊन हनुमानजींना हा प्रसाद अर्पण करा, त्यांना लाल फुले, सिंदूर आणि चोळाचा प्रसाद देखील द्या.यामुळे ते लवकर आनंदी होतात आणि तुमच्या इच्छा पूर्ण करतात. हे आपल्या जीवनात सकारात्मक ऊर्जा देखील आणते. जर तुम्हाला आयुष्यात कोणत्याही प्रकारचे संकट किंवा त्रास येत असेल तर तुम्ही हनुमान जयंतीच्या दिवशी सिंदूर आणि चमेलीच्या तेलाने विशेष उपाय करू शकता. यासाठी तुम्ही हनुमान जयंतीला मंदिरात जाऊन हनुमानजींना सिंदूर आणि चमेलीचे तेल अर्पण करावे. असे मानले जाते की हे हनुमानजींना खूप प्रिय आहे.हनुमान जयंती हा भक्ती आणि श्रद्धेचा दिवस आहे, जिथे भक्त हनुमानजींच्या चरणी लीन होऊन त्यांची पूजा करतात. हनुमानजींना संकटमोचक मानले जाते, त्यामुळे या दिवशी त्यांची पूजा केल्याने जीवनातील सर्व संकटांवर मात करता येते, असे मानले जाते. हनुमान हे रामायणातील एक प्रमुख पात्र आहेत, त्यामुळे हनुमान जयंतीच्या निमित्ताने त्यांचे स्मरण करून त्यांच्याकडून प्रेरणा घेतात. या दिवशी हनुमान चालीसा आणि रामायणातील सुंदरकांड वाचन करणे विशेष मानले जाते.

### स्वरूप

या दिवशी हनुमानाच्या देवळात सूर्योदयाच्या आधीपासून षोडशोपचार पूजेला तसेच कीर्तनाला प्रारंभ करतात. सूर्योदयाला हनुमानाचा जन्म होतो अशी कथा आहे, त्यानुसार कीर्तन संपते आणि सर्वांना प्रसाद वाटला जातो. हनुमान यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील अंजिनेरी येथे झाला असे मानले जाते. या दिवशी उत्तर भारतात विशेष रूपाने व्रत- उपवास यांचे पालन केले जाते. रामायणातील सुंदर कांड याचा पाठ वाचला जातो. हनुमान चालिसा याचा पाठ या दिवशी करणे महत्वाचे मानले जाते.

### जन्मकथा

वानर गणांचा मुख्य केसरी आणि त्याची पत्नी अंजनी यांचा हनुमान हा पुत्र आहे अशी हिंदू धमार्तील प्रचलित धारणा आहे. हनुमान हा श्रीरामांचा निससीम भक्त असल्याच्या कथा वाल्मिकी रामायणात आढळतात. भारतात रामकथा प्रसिद्ध असून हनुमानाची भक्ती ही सुद्धा प्रसिद्ध पावलेली आहे.

### पूजा पद्धती

महाराष्ट्र राज्यात सामान्यपणे शनिवार, तर उर्वरित भारतात शनिवार आणि मंगळवार हे मारुतीच्या पूजेचे वार मानले जातात. या दिवशी मारुतीला शेंदूर, तेल तसेच रुईची फुले आणि पाने अर्पण करण्याची प्रथा आहे. मारुतीला नारळ फोडण्याची रुढीही पूवार्पार चालत आलेली आहे. उत्तर भारतात सुद्धा हनुमानाची उपासना प्रसिद्ध आहे. तुलसीदास विरचित हनुमान चालिसा उत्तर भारतात विशेष लोकप्रिय आहे. समर्थ रामदास स्वामी यांनी महाराष्ट्रात १७ व्या शतकात स्वराज्य स्थापनेसाठी हनुमानाची उपासना महाराष्ट्रात पोहोचविली. त्यासाठी ११ विविध ठिकाणी मारुतीची मंदिरे स्थापन केली आणि बलाच्या उपासनेचे महत्व प्रस्थापित केले. रामदास स्वामी यांनी रचलेले भीमरूपी महारुद्रा हे मारुती स्तोत्र महाराष्ट्रात उपासनेचे मुख्य स्तोत्र मानले जाते.

### मंत्र

१. ओम हं हनुमते नमः !!

2. ओम नमो भगवते हनुमते नमः !!

3. अष्ट सिद्धी नव निधी
के दाता असा वर दीन
जानकी माता..!!




## मनोकामना पूर्तीसाठी हनुमान जयंतीला करा 'हे' विशेष उपाय

- सकाळी लाल किंवा नारंगी कपडे घालून उपवास करा.
- जर घरीच पूजा करत असाल तर एका ठिकाणी चौरंग ठेवून गंगाजलाने जागा शुद्ध करा.
- त्यानंतर लाल कापड घालून चौरंगावर भगवान हनुमानाची मूर्ती किंवा चित्र ठेवा. तसेच भगवान राम आणि माता सीता यांचे चित्रेही ठेवा.
- हनुमानजींना सिंदूर, तुळशीची पाने, लाल फुले अर्पण करा आणि बुंदीच्या लाडूचा नैवेद्य दाखवा. धूप लावा.
- त्यानंतर हनुमान चालीसा आणि सुंदरकांड पठण करा.
- नंतर तुपाचा दिवा आणि कापूर लावून हनुमानजीची आरती करा आणि प्रसाद ग्रहण करा.
- शक्य असल्यास हनुमान मंदिरात जाऊन दर्शन घ्या.

रामभक्त भगवान हनुमान हे चिरंजीवी आहेत आपण जाणतो. त्यांना संकटमोचन असेही म्हणतात कारण हनुमानजी भक्तांच्या हाकेला धावून येतात आणि त्यांना संकटातून तारतात असे बोलले जाते. पवित्र मनाने केलेली हनुमानजींची भक्ती नक्की फलित होते याचा अनुभव अनेकांना आहे. हनुमानजींना सर्वात प्रिय आहेत भगवान श्रीराम त्यामुळे मारुतीच्या भक्ती किंवा उपासनेत रामांचे नाव घेतल्याने ते प्रसन्न होतात आणि भक्तांवर कृपा करतात असे मानले जाते. आज पाहुयात हनुमान जयंतीला करता येणारे काही महत्वाचे उपाय आणि पूजापाठ ज्यामुळे हनुमान प्रसन्न होऊन तुमच्या मनोकामना पूर्ण करतील.

### हनुमानजींना प्रसन्न करण्याचे उपाय व पूजापाठ

#### 'रामनाम' जपणे

हनुमानजी रामभक्त आहेत हे आपल्याला माहितीये. त्यांना सर्वात प्रिय काय असेल तर ते भगवान राम. हनुमानजींच्या फोटो आपण पाहतो त्यांच्या हृदयात राम वसलेले आहेत. त्यामुळे मारुतीला प्रसन्न करण्यासाठी सर्वात प्रभावी आणि शक्तिशाली उपाय कोणता असेल तर तो रामनाम जपण्याचा. तुमच्या मुखातून रामनाम एकदा जरी आले तरी हनुमानजी आनंदी होतात. आता मनोकामना पूर्ण करण्यासाठी तुम्हाला हनुमान जयंतीच्या दिवशी राम नाम या मंत्राचा ११ वेळा किंवा संकल्प घेऊन १ लाख रामनाम जप करावा. ज्या भक्तांना हे जमणार नाही त्यांनी किमान १०८ वेळा तरी मनोभावे राम नाम यादिवशी जपावे. हनुमानजी कृपा करतील. तसेच रामनाम जप तुम्ही लिहू देखील शकता. एका वहीत लाल पेनाने स्वच्छ अक्षरात राम नाम जप लिहिल्याने सुद्धा मारुती प्रसन्न होतात.

#### हनुमान चालीसा पठण

हनुमानचालीसे अपार शक्ती आहे. हनुमान चालीसेची प्रत्येक पंक्ती प्रभावी आणि महत्वपूर्ण आहे. जो व्यक्ती नियमित हनुमानचलीसा वाचतो त्याच्या पाठीशी बजरंगबली सदैव उभे राहतात असे मानले जाते. हनुमान जयंतीच्या दिवशी अनेकजण आपली तीव्र मनोकामना पूर्ण करण्यासाठी सकाळी लवकर उठून १०० हनुमानचालीसा पठण करण्याचा संकल्प घेतात. अखंड ज्योत लावून यादिवशी पठण केलेली हनुमानचलीसा बजरंगबली स्वीकारतात आणि कृपा करतात. किमान १,५,७,११ अशा क्रमाने तुम्ही जमेल तितक्यावेळा हनुमानचालीसा यादिवशी वाचू शकता.

#### सुंदरकांड पठण


हनुमानजींना भगवान श्रीराम प्रिय असल्याने त्यांना समर्पित असणारा सुंदरकांडचा पाठ यादिवशी अनेक भक्त करतात. हनुमान मंदिरांमध्ये देखील यादिवशी सुंदरकांड पाठचे आयोजन केले जाते. भक्त मंत्रमुग्ध होऊन सुंदरकांड पाठ ऐकतात आणि म्हणतात सुद्धा. ज्यावेळी सुंदरकांड पाठ केला जातो त्यावेळी हनुमानजी साक्षात तो पाठ ऐकण्यासाठी विराजमान होतात त्यामुळे सुंदरकांडचा पाठ करताना हनुमानजींसाठी एक आसन लावले जाते. हा पाठ अत्यंत प्रभावी असल्याने तुम्ही हनुमानजयंतीला सुंदरकांड मारुतीला अवश्य ऐकवावे.

#### रुईच्या पानांची माळ

हनुमानजींच्या आईला म्हणजेच माता अंजनामाई यांना रुईचे झाड प्रिय होते. रुईच्या झाडाच्या त्या भक्त असल्याने त्यांनी आपल्या पुत्राला म्हणजेच हनुमानजींना बळ बुद्धी मिळण्यासाठी रुईच्या झाडाच्या पानांची माळ घातल्याची पौराणिक आख्यायिका आहे. त्यामुळे हनुमानजींना रुईच्या पानांची माळ घालतात. हनुमान जयंतीच्या दिवशी आपल्या मनातील इच्छा पूर्ण करण्यासाठी रुईच्या पानांवर चंदन किंवा अष्टगंधाने राम नाम लिहून, आपली मनोकामना सांगून ती माळ मारुतीच्या गळ्यात घालावी याने इच्छापूर्ती होते असे मानतात.

#### प्रसाद

मारुतींना चणे, गुळ आणि लाडू हे प्रसादात दाखवले जातात. हनुमानजींना शक्ती, ताकद यांचे प्रतीक मानल्याने त्यांना प्रामुख्याने बळ मिळण्याच्या गोष्टी म्हणजेच चणे आणि गुळाचा नैवेद्य दाखवतात. हा नैवेद्य हनुमानजी आनंदाने स्वीकारतात असे मानले जाते. तसेच त्यांना बेसन किंवा बुंदीच्या लाडवांचा नैवेद्य देखील दाखवला जातो. बुंदीचे लाडू त्यांना विशेष प्रिय आहेत. तसेच विड्याचे गोड पान देखील मारुतीला मनोकामना पूर्तीसाठी चढवले जाते. त्यामुळे हनुमानजयंतीच्या दिवशी त्यांना हे सर्व नैवेद्य अवश्य दाखवा.







## 'या' आहेत हनुमानाच्या प्रिय राशी

ज्योतीषशास्त्रानुसार १२ राशींपैकी अशा काही राशी आहेत ज्या रामभक्त हनुमानाला सर्वाधिक प्रिय आहेत. कारण या राशीच्या व्यक्तीं हनुमानाप्रमाणेच साहसी, निडर,उजार्वान आणि कर्तृत्ववान आणि प्रामाणिक असतात. त्यामुळे या राशी हनुमानाच्या व्यक्तीमत्वाशी साजेशा असल्यानेच हनुमानाला प्रिय आहेत.

- **मेष रास :** मेष राशीचा स्वामी ग्रह मंगळ असून हनुमानाचा संबंधही मंगळाशी आहे. त्यामुळे मेष रास ही हनुमानला सर्वाधिक प्रिय राशी आहे. या राशीच्या व्यक्ती साहसी व निडर असतात. त्यामुळे आयुष्यात येणा या प्रत्येक अडचणींवर हनुमानाच्या कृपेने या राशीच्या व्यक्ती सहज मात करतात. कठीण काळात न डगमगता त्यातून मार्ग काढण्याकडे या व्यक्तींचा कल असतो आणि त्यातून त्या अचूक मार्गही शोधतात आणि यश मिळवतात. यश मिळेपर्यंत मेष राशी अथक प्रयत्न करत राहते.
- **सिंह रास :** सिंह राशीचा स्वामी ग्रह सूर्य असून हनुमान सूर्याला गुरु मानतात. त्यामुळे सिंह राशीवरही हनुमानाची विशेष कृपा असते. या राशीच्या व्यक्तींमध्ये प्रचंड आत्मविश्वास आणि उर्जा असते. सिंह राशीला जन्मजातच नेतृत्वगुण लाभल्याने प्रभावशाली व्यक्ती बहुधा सिंह, मेष, वृश्चिक राशीच्या असतात. सिंह सूयार्ची रास असल्याने या राशीच्या व्यक्ती तडफदार , तजेलदार आणि कठोर निर्णय घेणाऱ्या असतात. अन्यायाविरोधात लढा देण्यात त्या पुढे असतात. हनुमानाची कृपा असल्याने त्या कोणत्याही क्षेत्रात सहज यश मिळवतात.
- **वृश्चिक रास :** वृश्चिक राशीचा स्वामी ग्रह मंगळ आहे. यामुळे हनुमानाच्या प्रिय राशींमध्ये वृश्चिकेचाही समावेश आहे. वृश्चिक राशीच्या व्यक्ती बुद्धीवान, गहन विचार आणि गूढ स्वभावाच्या असतात. हनुमानाच्या कृपेने या व्यक्ती सावधगिरी बाळगूनच निर्णय घेतात. कोणतेही काम घाईत करणे यांना जमत नाही. कामत सहज यश मिळवतात. वृश्चिक राशीच्या व्यक्ती कामाप्रती प्रामाणिक असतात. पण यांना जर राग आला तर आवरणे कठीण असते.

## राज्यातील 'ऑडिट' प्रश्नांकडे दुर्लक्ष
# ८९१ कोटी रुपयांच्या संभाव्य त्रुटींवर 'कॅग'चे ताशेरे

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कॅग) यांनी महाराष्ट्राच्या प्रशासनातील 'प्रणालीगत त्रुटी'अधोरेखित केल्या आहेत. विविध विभागांनी गेल्या दशकाभरात वारंवार स्मरणपत्रे देऊनही १०,००० हून अधिक 'ऑडिट' प्रश्नांना केराची टोपली दाखवल्यामुळे ८९१ कोटी रुपयांच्या संभाव्य आर्थिक अनियमितता समोर आल्या आहेत.

राज्य विधानसभेच्या नुकत्याच पार पडलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात मांडण्यात आलेल्या अहवालात, 'कॅग'ने विविध विभागांकडून कृती अहवाल दाखल करण्यात होणाऱ्या विलंबावर कडक टीका केली आहे. २,४०८ तपासणी अहवालांमधील प्रश्नांची उत्तरे देण्यात राज्याला आलेले अपयश हे 'प्रशासकीय जबाबदारी' आणि विधिमंडळाच्या देखरेखीला कमकुवत




करणारे असल्याचे अहवालात म्हटले आहे.

कॅगने काही खात्यांविषयी विचारलेले प्रश्न गेल्या दशकाहून अधिक काळापासून प्रलंबित असून, संबंधित विभागांनी त्यांना अनुत्तरित ठेवले आहे.

सर्वात जास्त प्रश्न प्रलंबित असलेल्या विभागांमध्ये सार्वजनिक बांधकाम, पाणीपुरवठा आणि स्वच्छता, कायदा व सुव्यवस्था (गृह आणि विधी विभाग), पर्यावरण, विज्ञान आणि तंत्रज्ञान, परिवहन (एसटी महामंडळ, मेरीटाईम बोर्ड, विमानतळ विकास कंपनी), ऊर्जा आणि वीज, उद्योग आणि वाणिज्य, माहिती तंत्रज्ञान आणि दळणवळण यांचा समावेश आहे. कॅगने एकूण १८६ शिफारसी सुचवल्या होत्या, त्यापैकी ११७ अजूनही प्रलंबित आहेत.

**प्रमुख आकडेवारी आणि निष्कर्ष**
- **प्रलंबित अहवाल :** जून २०२३ पर्यंत २,४०८ तपासणी अहवाल प्रलंबित होते, ज्यामध्ये १०,३४० परिच्छेद (प्रश्न) निराकरणाविना पडून आहेत.
- **आर्थिक फटका :** २०२२-२३ च्या स्वतंत्र स्थानिक ऑडिटमध्ये ८९१.२९ कोटी रुपयांच्या महसूल परिणामांसह २,११९ आक्षेप नोंदवण्यात आले. मात्र, त्यापैकी केवळ २५.५८ कोटी रुपयांची वसुली वर्षभरात होऊ शकली.
- **गंभीर अनियमितता :** या ऑडिट परिच्छेदांमध्ये निधीचा अपहार, अनधिकृत खर्च आणि नियमांचे उल्लंघन यांसारख्या विशिष्ट निरीक्षणांचा समावेश आहे, ज्यावर वेळेत कार्यवाही करणे आवश्यक होते.

## लाडक्या बहिणींना दिलासा!
# ३० एप्रिलपर्यंत करु शकतात ीङ उ, आदिती तटकरेंची माहिती




**■मुंबई। प्रतिनिधी,**

लाडकी बहीण योजनेसाठी ई-केवायसी करण्याची शेवटची मुदत ३१ मार्च २०२६ रोजी म्हणजे काल संपली होती. पण आता लाडक्या बहिणींसाठी पुन्हा एकदा एक मोठी बातमी आहे. लाडक्या बहिणींना आता आपली ई-केवायसी करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. आता ई-केवायसीची शेवटची मुदत ३० एप्रिल २०२६ आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींना दिलासा मिळाला आहे. राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री अदिती तटकरे यांनी याबाबत माहिती दिली आहे.

**काय आहे लाडकी बहीण योजना?**

विधानसभा निवडणुकीआधी सरकारकडून जाहीर करण्यात आलेल्या लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून गरजू महिलांच्या बँक खात्यावर प्रत्येक महिन्याला १५०० रुपये निधी जमा करण्यात येतो. या लोकप्रिय योजनेचा फायदा महायुती सरकारला चांगल्या पद्धतीने झाला, जे आता आपल्यासमोर आहे. मात्र, या योजनेत बोगस लाभार्थीसुद्धा याचा फायदा घेत असल्याचं सरकारच्या निदर्शनास आलं. फक्त आणि फक्त अडीच लाखांचे उत्पन्न असणाऱ्यांसाठीच असलेल्या या योजनेत भल्याभल्या सरकारी महिला कर्मचाऱ्यांनी देखील लाभ घेतल्याचं समोर आलं. या चुकीच्या प्रकारांवर अंकुश लावण्यासाठी ई-केवायसीची संकल्पना अंमलात आणली गेली, आणि बोगस लाभार्थ्यांना या योजनेतून गेट-आऊट करण्याची योजना आखली.

**ई-केवायसीची मुदत वाढवली**

त्यानुसार ई-केवायसीसाठी ३१ डिसेंबर २०२५ची शेवटची मुदत देण्यात आली. मात्र, त्यादरम्यान देखील महिलांना अनेक अडचणींना सामोरं जावं लागलं. नेमकं त्याचवेळी या संकेतस्थळात तांत्रिक अडचणी येऊ लागल्या आणि बऱ्याच महिलांच्या ई-केवायसी करण्यापासून वंचित राहिल्या. तरीही १ कोटी ७० लाख महिलांना ई-केवायसी करण्यात यश आलं. मोठी बाब म्हणजे, अनेक महिलांनी कुटुंबातील व्यक्ती सरकारी नोकरीत आहे किंवा नाही यासाठी देण्यात आलेल्या पर्यायांतून चुकीचा पर्याय निवडल्याने अनेक महिलांचा १५०० रुपयांचा हफ्ता आपोआप बंद झाला. दरम्यान, अशा महिलांच्या तक्रारीनंतर किंवा ज्यांची ई-केवायसी राहिलीय, अशा महिलांसाठी पुन्हा ३१ मार्च २०२६ची मुदत देण्यात आली, ती मुदत देखील काल मंगळवारी संपली. मात्र, त्याचदरम्यान, आता पुन्हा ही मुदतवाढ करुन ३० एप्रिल २०२६ करण्यात आली आहे.

## विरार-डहाणू रेल्वे मार्गावर मोठे बदल... नवीन ट्रॅक आणि वाढीव गाड्यांमुळे प्रवास होणार सुलभ

**■वसई। प्रतिनिधी,**

मुंबई उपनगरी रेल्वेवरील वाढत्या गदीर्मुळे त्रस्त झालेल्या प्रवाशांसाठी मोठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. रेल्वे प्रशासनाने संपूर्ण नेटवर्क विस्तार करण्याचा महत्वाकांशी आराखडा हाती घेतला असून, विशेषतः विरार ते डहाणू पट्ट्यात मोठे बदल होणार आहेत. नवीन ट्रॅक, वाढीव गाड्या आणि स्थानकांचा विस्तार यामुळे भविष्यात प्रवास अधिक सुलभ आणि वेगवान होणार आहे.

मुंबई उपनगरी रेल्वे ही देशातील सर्वाधिक व्यस्त रेल्वे सेवा मानफ्रं'६८ ठी६२: विरार-डहाणू रेल्वे मार्गावर मोठे बदल; नवीन ट्रॅक आणि वाढीव गाड्यांमुळे प्रवास होणार सुलभली जाते. दररोज हजारो गाड्या धावत असतानाही प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता रेल्वे व्यवस्थेवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून रेल्वे प्रशासनाने मोठ्या प्रमाणावर विस्तार योजना राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेअंतर्गत विरार ते डहाणू दरम्यान तिसरा आणि चौथा रेल्वेमार्ग उभारण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या मार्गावर उपनगरी आणि दूरपल्ल्याच्या गाड्या एकाच ट्रॅकवर चालत असल्याने अडथळे निर्माण होतात. नवीन ट्रॅक तयार झाल्यानंतर दोन्ही प्रकारच्या गाड्यांची




वाहतूक स्वतंत्रपणे करता येणार असून, वेळेचे नियोजन अधिक अचूक होईल.

तसेच बोरिवली ते विरार या मार्गावर पाचवा आणि सहावा ट्रॅक उभरण्याचेही काम सुरू आहे. यामुळे पालघर, बोईसर, सफाळे आणि डहाणू परिसरातील प्रवाशांसाठी रेल्वे सेवा अधिक सक्षम होणार आहे. याशिवाय वसई रोड स्थानकाचा मोठ्या प्रमाणावर विस्तार केला जात असून, येथे नवीन फलाट आणि गड्यांसाठी स्वतंत्र लाईन्स उभारल्या जात आहेत.

रेल्वे प्रशासनाने गाड्यांची संख्या वाढवण्यावरही भर दिला आहे. 12 डब्यांच्या गाड्यांऐवजी 15 डब्यांच्या गाड्या वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे एका फेरीत अधिक प्रवासी प्रवास करू शकतील. याशिवाय टप्प्याटप्प्याने 200 हून अधिक नवीन गाड्या सेवेत आणण्याचे नियोजन आहे.

प्रवाशांच्या सोयीसाठी मीरा रोड, विरार आणि डहाणू परिसरात स्वतंत्र यार्ड आणि दुरुस्ती केंद्रे उभारली जाणार आहेत. यामुळे गाड्यांची देखभाल जलद होऊन सेवा अधिक नियमित राहील. तसेच काही दूरपल्ल्याच्या गाड्यांचे अंतिम स्थानक बदलून मुख्य मार्गावरील ताण कमी करण्याचाही विचार केला जात आहे. या सर्व उपाययोजनांमुळे विरार-डहाणू पट्ट्यातील प्रवाशांना रोजच्या गदीर्तून मोठा दिलासा मिळणार असून, भविष्यातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करून रेल्वे सेवा अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

## भाईंदरमधील तरुणी 8 महिन्यांपासून बेपत्ता




**■भाईंदर। प्रतिनिधी,**

भाईंदर पूर्वेच्या नवघर परिसरातून २९ जुलै २०२५ रोजी मंदिरात गेलेली ३३ वर्षीय तरुणी अद्यापही घरी परतलेली नाही. भारती उर्फ ट्विंकल असे या तरुणीचे नाव असून, गेल्या आठ महिन्यांपासून तिचे कुटुंब तिच्या येण्याकडे डोळे लावून बसले आहे. या प्रकरणी स्थानिक पोलिसांनी अधिक गांभियार्ने तपास करण्याची मागणी तिच्या कुटुंबियांनी केली आहे. दाखल तक्रारीनुसार कुर्ला येथे पानाचे छोटे दुकान चालवणारे राजेश उपाध्याय यांची मुलगी ट्विंकल ही २९ जुलै रोजी नेहमीप्रमाणे जवळच्या बजरंगबली मंदिरात दर्शनासाठी गेली होती. मात्र, तासनतास उलटूनही ती घरी न-परतल्याने कुटुंबाने शोधाशोध सुरू केली. ट्विंकलचे शिक्षण आठवीपर्यंत झाले असून ती अत्यंत शांत स्वभावाची होती. विशेष म्हणजे, ती मोबाईल फोन किंवा सोशल मीडियाचा वापर करत नव्हती, ज्यामुळे तिचा शोध घेण्यात अधिक अडचणी येत आहेत. माझी मुलगी कुठे गेली? असा केविलवाणा प्रश्न राजेश उपाध्याय आजही प्रत्येक येर्णाया-जार्णायाला विचारत आहेत. आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने आणि मुलगी बेपत्ता असल्याने हे कुटुंब पूर्णपणे कोलमडून गेले आहे.

## मुंबईत ३४० झाडांचा गुदमरलेला श्वास झाला मोकळा

**■मुंबई। प्रतिनिधी,**

मुंबई महानगरपालिकेकडून सन २०२५ मध्ये तब्बल ३४० वृक्षांभोवतीचे कॉंक्रिट काढण्यात आले आहे. तर १ हजार ४६० झाडांवरील जाहिरात फलक तसेच झाडांवरील तब्बल १७.४३ किलो खिळे काढण्यात आल्याचा दावा महापालिका उद्यान विभागाने केला आहे. मात्र,वृक्षांना आवश्यक पाणी व प्राणवायू मिळून सुदृढ वाढ होण्यास मदत होण्यासाठी दरवर्षीप्रमाणेच यंदाही सार्वजनिक ठिकाणांवरील वृक्षांच्या संवर्धनासाठी ह्यवृक्ष संजीवनीह्ण अभियान जागतिक वसुंधरा दिन (२२ एप्रिल) निमित्ताने १ एप्रिल ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे.

मुंबईत सध्या एकूण २९ लाख ७५ हजार २८३ वृक्ष आहेत. त्यापैकी सुमारे १३ लाख ५४ हजार ९६६ वृक्ष रस्त्यांच्या कडेला, उद्यानांमध्ये व इतर



सार्वजनिक ठिकाणी आहेत. या वृक्षांच्या आरोग्य संवर्धनासाठी ह्यवृक्ष संजीवनीह्ण हे अभियान महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

या अभियान अंतर्गत वृक्षांभोवती साचलेले सिमेंट-कॉंक्रिट काढून त्याजागी मोकळी लाल माती टाकणे, झाडांच्या खोडांवर ठोकलेले खिळे, जाहिरात फलक, दोऱ्या व केबल्स काढणे, तसेच पादचाऱ्यांना अडथळा ठरणाऱ्या फांद्यांची छाटणी करणे अशा उपाययोजना केल्या जातात. झाडांच्या खोडांना गेरू-चुना लावून त्यांचे संरक्षण करण्याचे कामही यामध्ये समाविष्ट आहे.

तज्ज्ञांच्या मते, वृक्षांच्या मुळांभोवती कॉंक्रिट असल्यास पाणी जमिनीत मुरत नाही, परिणामी मुळांची वाढ खुंटते आणि झाडे कोमेजण्याचा धोका वाढतो. तसेच खिळे, वायर व जाहिरात फलकांमुळे झाडांच्या खोडाला इजा होऊन भविष्यात झाडे कोसळण्याची शक्यता निर्माण होते. महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) वृक्ष जतन व संवर्धन अधिनियम, १९७५ अंतर्गत जनजागृती करणे, हे वृक्ष प्राधिकरणाचे कर्तव्य असल्याने या अभियानाला विशेष महत्त्व आहे. या अभियानात शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था आणि नागरिकांचा सहभाग घेतला जाणार आहे. महानगरपालिकेच्या विविध विभागांतील कर्मचारीही यामध्ये सहभागी होणार आहेत. विशेष म्हणजे, उपलब्ध संसाधनांचा वापर करुन ही मोहीम राबविण्यात येणार आहे, अशी माहिती उद्यान अधीक्षक जितेंद्र परदेशी यांनी दिली.

## समुद्रात जाणारा कचऱ्यासाठी आवश्यक त्याठिकाणी 'ट्रॅश बूम'

**■मुंबई। प्रतिनिधी,**

ट्रॅश बूममुळे नदी, नाले आणि समुद्रात तरंगणारा कचरा अडवला जातो. प्रामुख्याने नाल्यांच्या तोंडावर लावल्या जाणाऱ्या ट्रॅश बूममुळे कचरा समुद्रात जाण्यापासून रोखला जातो आणि तो सहजपणे गोळा करून विल्हेवाट लावता येते. महानगरपालिकेकडे एकूण १४ ट्रॅश बूम आहेत. तसेच आवश्यक त्या ठिकाणी 'ट्रॅश बूम' चा वापर करावा,असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ भूषण गगराणी यांनी दिले आहेत.

राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण यांनी ऑक्टोबर २०२० रोजी पारित केलेल्या आदेशात मुंबई महानगरपालिकेला खारफुटीचा भाग प्लास्टिक मुक्त ठेवण्याकरिता नाले आणि नद्यांमधील तरंगता कचरा वाहून समुद्रात थेट जाण्यापासून रोखण्याकरीता योग्यती कार्यवाही करण्याचे निर्देश दिलेले आहेत. तसेच तरंगता प्लास्टिक व



इतर कचरा जमा करुन त्याची विल्हेवाट लावण्याकरिता ट्रॅश बुम बसविण्याची शिफारस केलेली होती. त्यानुसार विविध नाल्यांतील तरंगता कचरा जमा करणे, बाहेर काढणे व त्याची विल्हेवाट लावण्याकरीता ट्रॅश बुमसहित तराफा आरुढ कचरा वाहक प्रणालीचा बसवून कार्यवाही केली जात आहे.

मुंबईत पूर्वी १६ ठिकाणी या प्रणालीचा वापर करण्यात येणार होता, त्यातील प्रत्यक्षात ८ ठिकाणीच याचा वापर करण्यात येणार होता आणि ०८ उर्वरीत ठिकाणी सीएसआर निधीतून ही प्रणाली बसवण्यात येणार होता. सीएसआर निधीतून या प्रणालीचा वापर केल्यामुळे यावर होणारा महापालिकेचा कोट्यवधी रुपयांचा खर्च वाचला गेला आहे.

मात्र, आतापर्यंत महानगरपालिकेला एकूण १४ ट्रॅश बूम बसवण्यात यश आले आहे. यात मोगरा नाला, मजास नाला, मानखुर्द नाला, सोमय्या नाला, वाकोला नाला व दादर-धारावी नाल्याच्या ठिकाणी अधिक प्रभावीपणे कामकाज करावे लागणार आहे. या सर्वठिकाणी 'ट्रॅश बूम' आणि अन्य यंत्रसामुग्री तैनात करावी. पर्जन्य जल वाहिन्यांची सुरु असलेली सर्व कामे ३१ मे २०२६ पर्यंत पूर्ण करावीत. रेल्वे प्रशासन, मेट्रो प्रशासन यांच्या समवेत संयुक्त दौरा करावा. रेल्वे तथा मेट्रो कार्यस्थळी भेटी देऊन पाहणी करावी, असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ भूषण गगराणी यांनी दिले आहे.

**नालेसफाईच्या कामांसाठी डॅशबोर्ड**

नागरिकांना नाल्यातील गाळ काढण्याच्या कामाची इत्यंभूत माहिती मिळावी म्हणून महानगरपालिका प्रशासनाने महानगरपालिका संकेतस्थळावरील डॅशबोर्डवर छायाचित्रं तथा चित्रफीती उपलब्ध करून दिल्या आहेत. जेणेकरून नागरिकांना त्यांच्या परिसरातील नाल्यांमधून गाळ उपसा कामांचे तपशील पाहता येतात. त्यामुळे नाल्यातून गाळ काढल्यानंतर गाळाची तत्काळ वाहतूक सुरु करावी. जेणेकरून 'डॅशबोर्ड'वर त्याची माहिती तत्काळ सार्वजनिकरित्या प्रदर्शित होईल. तसेच, नागरिकांना वास्तविक वेळेत (रिअल टाइम) प्रगती पाहता येईल. डॅशबोर्डची लिंक नागरिकांबरोबरच लोकप्रतिनिधी, प्रसार माध्यमे, समाज माध्यमे यांना उपलब्ध करून द्यावी, असे गगराणी यांनी नमूद केले.

## लग्नाचे आमिष दाखवून तरुणीशी शरीरसंबंध... लग्नपत्रिका छापल्यानंतर जातीचं कारण सांगत लग्नास दिला नकार

**■मुंबई। प्रतिनिधी,**

तरुणाने लग्नाचे आमिष दाखवून एका तरुणीशी शरीरसंबंध ठेवले, नंतर लग्नपत्रिका छापल्यानंतर पीडित तरुणीशी विवाह करण्यास नकार दिला. तरुणाने लग्नास नकार दिल्याचे कारण देखील समोर आले आहे.

जातीचे कारण सांगून त्याने लग्नाचा प्रस्ताव धुडकावून लावला. पीडितेच्या तक्रारीच्या आधारे पोलिसांनी बीएनएस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला, तसेच आरोपीला अटक करण्यात आली आहे.

**जातीचे कारण देऊन लग्नास नकार**

लग्नाची तारीख 14 फेब्रुवारी 2026 अशी निश्चित केली होती. परंतु शेवटच्या क्षणी आरोपी आणि त्याच्या कुटुंबीयांनी जातीचे कारण देऊन लग्नास नकार दिला. पोलिसांनी या प्रकरणातील मुख्य आरोपी कान्हा चेलानीला अटक केली, तसेच त्याचा भाऊ आशिष याला सुरुवातीलाच तुरूंगात टाकण्यात आले.



ही घटना मध्य प्रदेशातील शहडोल जिल्ह्यात घडली.

**तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून सतत केले लैंगिक अत्याचार**

शहाडोल जिल्ह्यातील बुधर पोलीस ठाणे परिसरातील कान्हा चेलानी नावाच्या तरुणाने एका तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिचे शोषण केले, पण लग्नाची वेळ आल्यानंतर तरुणाने तिला लग्नास नकार दिला. जातीचे कारण सांगून तरुणाने पीडितेशी संबंध तोडल्याचं सांगितलं. पीडितेनं आरोप केला की, आरोपी कान्हा चेलानीने तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढळे आणि लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी वाईट कृत्य केले.

बुधर पोलीस ठाण्याचे प्रभारी विनय सिंह यांनी माहिती दिली की, 10 फेब्रुवारी रोजी पीडिता पोलीस ठाण्यात आली आणि लग्नाचे आमिष दाखवून आपले शारीरिक शोषण झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली. या प्रकरणात आरोपीच्या भावाला यापूर्वीच अटक करण्यात आली. आरोपीला न्यायालयात हजर करून तुरुंगात पाठवले.

## वडिलांसोबतच्या भांडणाचा राग मुलावर काढला
# 4 वर्षांच्या चिमुरड्याला हवेत भिरकावून आपटले



दरम्यान, पोलिसांनी तातडीने कारवाई करत आरोपीला अटक केली आहे. या प्रकरणाचा अधिक तपास सुरु असून नेमकी घटना कशामुळे घडली याचा शोध घेतला जात आहे. बालकावर झालेल्या या क्रूर हल्ल्यामुळे वसई परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**■वसई। प्रतिनिधी,**

वसई पश्चिमेतील घर अनुपमा सोसायटी परिसरात चार वर्षीय विघ्नेश या चिमुकल्यावर अमानुष मारहाण झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी रिक्षाचालक संदीप पवार याला पोलिसांनी अटक केली असून त्याच्याविरोधात वसई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी संदीप पवार याचे विघ्नेशच्या वडिलांसोबत काही कारणावरून वाद झाले होते. या वादाच्या रागातून त्याने निरपराध मुलावर संताप काढल्याचे समोर येत आहे. संतप्त अवस्थेत आरोपीने विघ्नेशला रिक्षाच्या लोखंडी रॉडवर आपटले तसेच त्याला रस्त्यावर जोरात फेकून फरफटत नेल्याचे भयावह दृश्य समोर आले आहे.

ही संपूर्ण घटना सोसायटीतील सीसीटीव्ही कॅमेरात कैद झाली असून त्यातील दृश्ये अत्यंत धक्कादायक आहेत. या घटनेनंतर परिसरात संतापाची लाट उसळली असून नागरिकांनी आरोपीविरोधात कठोर कारवाईची मागणी केली आहे. जखमी विघ्नेशवर भाईदर येथील ओढकार रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली आहे. मुलाच्या प्रकृतीबाबत कुटुंबीयांमध्ये मोठी चिंता व्यक्त केली जात आहे.

## इस्त्रो शास्त्रज्ञ असल्याचं भासवून शरीरसंबंध, नवी मुंबईच्या भामट्याचा राज्यात 11 महिलांना गंडा, 12 खोटी नावं वापरली

**■नवी मुंबई। प्रतिनिधी,**

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरातच्या कारनाम्यांनी राज्य हादरले असतानाच, नवी मुंबईत महिलांच्या लैंगिक शोषणाचा असाच धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. इस्त्रोमध्ये शास्त्रज्ञ असल्याचे सांगून उच्चशिक्षित व उच्चभ्रू महिलांना प्रेमाच्या जाळ्यात ओढणाऱ्या तरुणाला नवी मुंबई गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या आहेत.

**काय आहे प्रकरण?**

आदर्श म्हात्रे असे त्याचे नाव असून, त्याने डझनभर महिलांचे लैंगिक व आर्थिक शोषण केल्याचे समोर आले



आहे. केवळ दहावी पास असलेल्या आदर्शने विवाह जुळवणारी संकेतस्थळे व अन्य सोशल मीडिया व्यासपीठांवर बनावट प्रोफाइल तयार केली होती. कधी इस्त्रोचा शास्त्रज्ञ, तर कधी ह्यपीडब्ल्यूडीह्णमध्ये उच्चपदस्थ अधिकारी असल्याचे तो सांगायचा.

**शरीरसंबंध आणि पैशांची लूट**

राहणीमान मोठ्या अधिकाऱ्यासारखे ठेवून तो डॉक्टर, इंजिनीअर आणि बँक अधिकारी यांसारख्या उच्चशिक्षित महिलांना हेरायचा. लग्नाच्या भूलथापा देऊन त्यांच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित करणे आणि त्यानंतर पैशांची गरज असल्याचे भासवून लाखो रुपये उकळणे, ही त्याची ह्यमोडस ऑपरेंडीह्ण होती.

**बोगस शास्त्रज्ञाची १२ नावे**

पोलिस तपासात आदर्श म्हात्रेने स्वप्नील वारुळे, हेमंत गायकर, नहुश म्हात्रे, रूद्रेश गोंधळी अशी वेगवेगळी नावे वापरल्याचे आढळून आले आहे. तो अत्यंत चलाखीने आपली ओळख बदलून महिलांचा विश्वास संपादन करायचा. नाशिकच्या अशोक खरातने भोंदूबाबाचा मुखवटा ओढून महिलांची फसवणूक केली, त्याच धर्तीवर आदर्शने बोगस शास्त्रज्ञ बनून महिलांच्या आयुष्याशी खेळ केल्याचे उघडकीस आले आहे.

**राज्याच्या विविध भागात महिलांना फसवलं**

आदर्श हा एका महिलेकडून लुबाडलेले पैसे दुसऱ्या महिलांसाठी वापरायचा. उरलेली रक्कम तो मौज मजा व चैनीच्या आयुष्यावर, तसेच कॅसिनोमध्ये उडवायचा. त्याने केवळ नवी मुंबईतच नव्हे, तर ठाणे, मुंबई, पिंपरी-चिंचवड, नागपूर आणि यवतमाळ अशा विविध शहरांतील अनेक महिलांना जाळ्यात ओढले असून, आत्तापर्यंत त्याच्यावर विविध पोलिस ठाण्यांत ११ गुन्हे दाखल झाले आहेत. पोलिस निरीक्षक सुनील शिंदे आणि त्यांच्या पथकाने तांत्रिक तपासाद्वारे आदर्शला अटक केली. या प्रकरणात फसवणूक झालेल्या महिलांचा आकडा वाढण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

"आदर्शने अनेक महिलांचे शोषण केले असल्याचा अंदाज असून बदनामीच्या भीतीने अनेक पीडित महिला तक्रार देण्यासाठी पुढे येत नसल्याचे चित्र आहे. महिलांनी विवाह जुळवणाऱ्या संकेतस्थळांवरील व्यक्तीची पूर्ण खातरजमा केल्याशिवाय कोणतेही आर्थिक व्यवहार करू नयेत. शिवाय कोणाची फसवणूक झाली असेल, तर त्यांनी न घाबरता तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा."

**-प्रेरणा कट्टे, सहायक पोलिस आयुक्त, गुन्हे शाखा**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधीन राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com